# तिफण

वर्ष : १५ वे । अंक : दुसरा
एप्रिल ते जून : २०२४

# भारतीय आदिवासी लोकधारा विशेषांक



संपादक

डॉ. शिवाजी भिकाजी हुसे

Sakri (Dhule)

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule




**UGC Care Listed Journal**

ISSN 2231-573X

साहित्य, कला आणि
लोकसंस्कृतीला वाहिलेले

त्रैमासिक

# तिफण

भारतीय आदिवासी
लोकधारा विशेषांक

**वर्ष : १५ वे, अंक : दुसरा**
**एप्रिल ते जून** : २०२४

संपादक : **डॉ. शिवाजी हुसे**
अतिथी संपादक : **डॉ. संतोष धनेधर**

■ **संपादक मंडळ**
डॉ. सर्जेराव जिगे, डॉ. दिलीप बिरुटे,
डॉ. ताहेर पठाण, डॉ. रामचंद्र झाडे,
डॉ. सुभाष बागल, डॉ. दत्तात्रय डुंबरे,
डॉ. सुभाष शेकडे, डॉ. सुखदेव इघारे,
डॉ. प्रेमला मुखेडकर, डॉ. राजकुमार मुसणे.
डॉ. रंजना कदम, डॉ. यशवंत सोनुने

■ **मुद्रक**
रुद्रायणी, छत्रपती संभाजीनगर.

■ **मुखपृष्ठ, मांडणी व सजावट**
मंदार नागरे, छत्रपती संभाजीनगर
मो. ९४०४६११५९६

■ **मुखपृष्ठ छायाचित्र**
डॉ. रमेश सूर्यवंशी, कन्नड

■ **वर्गणी**
वार्षिक सहयोग मूल्य : रु. ५०० -

■ **वर्गणी अशीही भरता येईल-**
संपादक, 'तिफण', बँक ऑफ महाराष्ट्र
शाखा : कन्नड, खाते क्र. 60287405377
आय.एफ.एस.सी. कोड क्र. MAHB0000259

■ **स्वागत मूल्य : २५०/- रुपये**

■ **संपादन :** अवैतनिक

■ **साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता**
डॉ. शिवाजी हुसे, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड- ४३१ १०३,
जि. छत्रपती संभाजीनगर. मो. ९४०४०००३९८
E-mail: tifanprakashan2024@gmail.com

(या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

Sakri (Dhule)

PRINCIPAL
T.S.S's.Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science C...



# ग्रामीण आणि आदिवासी समस्यांचे साहित्यिक प्रतिबिंब

**प्रा.डॉ. वसुमती पुंडलिकराव पाटील**

साहित्य आणि समाज परस्परावलंबी आहेत. साहित्यातून समाज घडतो. साहित्यातून प्रेरणादायी मूल्ये रुजतात. कोणत्याही देशाची शासन व्यवस्था जर का डळमळीत झाली तर त्याचे प्रतिबिंब हे प्रसार माध्यम आणि साहित्यातून समाजात उमटत असते. साहित्यिक हा देखील समाजाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. साहित्यिक समाज जीवनाचा सांगोपांग अभ्यास, त्याची अनुभूती, निरीक्षण करून मगच त्याचे साहित्यात रेखाटन करीत असतो. त्या अनुषंगानेच साहित्य हा समाज जीवनाचा आरसा होय. शैक्षणिक व वाड्.मयीन घडामोडींचा परिणाम म्हणून वेगवेगळे वाड्.मय प्रवाह निर्माण झाले. त्यात आदिवासी साहित्याचा समावेश आहे. आदिवासी जनजीवन, त्यांच्या समस्या, त्यांचे सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक जीवन इत्यादी बाबतीत अभ्यास, संशोधन अगदी इंग्रजांच्या काळापासून झालेले दिसून येते. परंतु त्यापुढे स्वातंत्र्योत्तर काळातील बदलांमुळे आदिवासी जमातीतूनही संवेदनशीलतेने साहित्य निर्माण करणारी साहित्यिकांची पिढी निर्माण झाली.

मराठी साहित्यात अनेक चळवळी दिसून येतात जसे की संत साहित्य चळवळ, ग्रामीण साहित्य, दलित साहित्य इत्यादी परंतु गाव कुसाबाहेरील डोंगरदऱ्यांमधील जीवन जगणाऱ्या आदिवासींच्या जीवनशैलीविषयक समस्यांचा जेव्हा विचार होऊ लागला तेव्हा आदिवासी साहित्य चळवळ उभी राहिली. त्याही पुढे जेव्हा स्वतंत्र आदिवासी साहित्य संमेलने आयोजित केले गेले तेव्हाच खऱ्या अर्थाने आदिवासी समाजाच्या प्रश्नांना वाचा मिळाली. मुक्तीचा प्रवास सुरू झाला .त्यांच्या समस्या समजून घेण्यास वाव मिळाला आणि त्यातूनच पुढे जाऊन आदिवासी साहित्यिकांना प्रोत्साहन मिळाले.

डोंगरदऱ्यात दुर्गम अशा भागांमध्ये राहणारा, मागासलेला, नागर संस्कृती पासून दूर राहणाऱ्या आदिवासी समाजाची जीवनशैली, संस्कृती नागर संस्कृतीपेक्षा वेगळेपण दर्शवणारी असल्याने अनेक अभ्यासक- संशोधकांना त्यांच्याविषयी अभ्यास



Late Dr. B. S. Desale Science College Sakri (Dhule)

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

करण्याची ओढ निर्माण झाली. प्राचीन काळापासून वेगवेगळ्या कारणांनी आदिवासी जमातींच्या जीवनसंस्कृतीचा उल्लेख विविध ग्रंथांमधून आढळतो. कालांतराने जिज्ञासा पोटी आदिवासी समाजाविषयी साहित्य निर्माण होऊ लागले. १९ व्या शतकात संशोधक, अभ्यासक, मिशनरी, व्यापारी यांनी शोधलेल्या या समाजाकडे राजकीय तत्त्ववेत्त्यांचेही लक्ष वेधले गेले. विचारवंतांनी जाणून घेण्याचा प्रयत्न केला की हा समाज पूर्वी कोणत्या अवस्थेत कसा, कोठे वास्तव्य करीत होता. 'रुसोने ही अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आपल्या ग्रंथात वन्य लोकांच्या जीवनासंबंधी मोठे रम्य चित्र रेखाटले. ते जीवन साधे, स्वतंत्र आणि निश्चिंत आहे असे तो म्हणतो'१ एकंदरीत त्यांच्या अभ्यासातून त्याने आदिवासी मानवाच्या नैसर्गिक जीवन पद्धतीचे कौतुक केले आहे. परंतु काही आदिवासी जमाती झपाट्याने नष्ट होत आहेत. शहर संस्कृतीशी त्यांचा संपर्क व धर्मांतर मुळे तसेच काही जुन्या रूढी- परंपरा, अंधश्रद्धा यामुळे देखील आदिवासी जमातीत मृत्यूचे प्रमाण वाढलेले दिसते. तेव्हा या जमातींच्या नष्ट होण्यापूर्वी त्यांच्या संस्कृतीचा, त्यांच्या जीवनपद्धतींचा व समस्यांचा अभ्यास व्हावा असे समाजशास्त्रज्ञांना व मानसशास्त्रज्ञांना वाटू लागले.

मराठी साहित्यातील विविध वाड्.मय प्रकारांमधून आदिवासींचे चित्रण केले गेले आहे. मग ते कवितासंग्रह असो, कथा असो किंवा कादंबरी असो. आदिवासींचे जीवन, संस्कृती, समस्या यांचे एकत्रित चित्रण त्यामधून प्रकट झालेले दिसते. आचार्य शं.रा. भिसे यांनी 'जंगलातील छाया'(१९४५) ही कादंबरी लिहिली आहे. जंगलात राहणारे लोक जंगलाच्या व्यापारी वर्गाकडून कसे नाडले, गांजले जातात याचे वर्णन कादंबरीत चित्रित केलेले आहे. आदिवासींच्या मनातील भावना, त्यांची अस्वस्थता त्यामध्ये मांडण्यात आलेली आहे. आदिवासींचा सावकारांनी केलेला छळ, त्यांची गुलामगिरी, आदिवासी स्त्रियांच्या अब्रूची किंमत नव्हती. न्याय मागण्यासाठी आदिवासी लोक जेव्हा वकिलांकडे जात तेव्हा त्यांच्याकडून ही कशी फसवणूक होत असे याचेही जिवंत चित्रण कादंबरीतून दिसून येते. गो. नी. दांडेकर यांची 'ठाकर' या आदिवासी जमातीवरील 'जैत रे जैत'(१९६५) ही कादंबरी होय. भगत त्यांचे विधी आणि काही अंधश्रद्धा यांचे संयुक्त चित्रण कादंबरीतील पात्रांमधून चित्रित झालेले दिसून येते. ठाकर या आदिवासी जातीच्या दारिद्र्याचे चित्रण त्यातून समोर येते.

आदिवासी साहित्य म्हणजे केवळ आदिवासींचे जीवन रेखाटणे नव्हे तर त्यामध्ये आदिवासींचा 'स्व' रेखाटणे महत्त्वपूर्ण ठरते. आदिम समाजाची नवनिर्मिती आणि त्यांच्या भाव-भावनांना चित्रित करण्याचा उद्देश त्यामागे दडलेला आहे. आदिवासी साहित्य प्रवाहामधील पहिल्या आदिवासी लेखिका नजुबाई गावित यांची तृष्णा ही चार खंडातील आत्मवृत्त पर कादंबरी होय. आदिवासी स्त्रीचा छळ, शोषण- पिळवणूक, अस्वस्थता, पिढींमधील अंतर, प्रथा, परंपरा या सर्व गोष्टींचे वास्तविक चित्रण या कादंबरीमध्ये रेखाटलेले आहे. कोणत्याही साहित्य प्रकारामध्ये कविता हा साहित्यप्रकार अतिशय उत्कट, तरल आणि विचारगर्भ साहित्य प्रकार आहे. आदिवासी कवींनी देखील अशा आदिवासी समाजाचे अस्तित्व आणि त्यासाठी त्यांना सहन कराव्या लागणाऱ्या अडचणींना वाचा दिली ती आपल्या कवितांमधून होय. उदा: भुजंग मेश्राम यांचे 'उलगुलान',वाहरु सोनवणे यांची 'गोधड', डॉ.विनायक तुमराम यांचा 'गोंडवन पेटले आहे' इत्यादी कविता संग्रह होय. असे अनेक कवींनी लिहिलेल्या कवितांमधून आदिवासी बोली- संस्कृती, आदिवासी जीवन रेखाटताना ओघाने सहजगत्या त्यांच्या आयुष्यातील माणूसपण हिरावून घेताना निर्माण झालेल्या समस्यांचे चित्रण स्पष्ट होताना दिसते.



Sakri (Dhule)
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist Dhule

से की 'गोंधड' या कवितासंग्रहातील 'उपाशी झोपू का' या कवितेतून आदिवासी समाजातील लोकांची पासमार, तळमळ -अस्वस्थता कवीला बेचैन करते. याचप्रमाणे कवी वाहरु सोनवणे यांचे समाजाचे नेरीक्षण चौकस, जबाबदारी सभर दिसून येते. वाहरु सोनवणे यांच्या 'देवदासी' आणि 'पाल मांडी वस्ती' या कवितांमधून आदिवासी स्त्रीवर होणाऱ्या अत्याचार, स्त्रीची दुर्बलता याविषयी तळमळ वाटून स्त्रीला देखील एक स्वतःचे मन, भावना, अस्तित्व असते याची जाणीव करून देण्याच्या देण्याचा प्रयत्न कवी करताना दिसतात.

आदिवासी साहित्यातून आदिवासी समाजाच्या पूर्व इतिहासाबद्दल शोध घेतलेला आढळून येतो. देशाच्या सर्वच क्षेत्रातील मग तो सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक वा शैक्षणिक असो. आदिवासींच्या कर्तुत्वाला, त्यांच्या अस्तित्वाचा वाटा देखील मोलाचा आहे. कारण निसर्गाशी नाळ जोडलेला हा समाज शिक्षण, तंत्रज्ञान, प्रगत अशा जीवनशैली पासून लांब असला तरी मात्र त्यांचे निसर्गपूजक असणे त्यातून सकारात्मक व समाधानी जीवन जगण्याची प्रवृत्ती तसेच त्यांच्या समाजात स्त्रीला असलेले मानाचे स्थान विशेष म्हणजे असेल त्या परिस्थितीमध्ये आनंदी- उत्साही असणारा हा समाज वैशिष्ट्यपूर्णच आहे. त्या संदर्भात डॉ.गोविंद गारे म्हणतात की 'इतिहासाचे स्मरण करा, इतिहासाची पुन:मांडणी करा, त्यातून साहित्याच्या राशी निर्माण होतील अनेक नवे विचार साहित्यिकांच्या मन:पटलावर रुंजी घालू लागतील, शब्द बोलू लागतील, फुलू लागतील व साहित्याला अंकुर येईल'२ यावरून असे म्हणणे वावगे ठरणार नाही की अशा या आदिवासी साहित्यातून की ज्यामध्ये स्वतःच्या अस्तित्वाचे भान आत्मवाढीचे सामर्थ्य आणि परिवर्तनाची ओळख करू पाहणाऱ्या आदिवासी साहित्याने मराठी साहित्य प्रवाहात एक वेगळा ठसा उमटविला आहे.

आज आदिवासी समाजासमोर अनेक नवीन आव्हाने, नवीन प्रश्न- समस्या, अडचणी येऊन ठेपलेले आहेत. एका विशिष्ट अशा संक्रमण अवस्थेत कोणत्याही नवीन समस्यांची झळ ही मात्र प्राथमिक अवस्थेतील जीवन कंठणाऱ्या लोकांना सर्वप्रथम सोसावी लागते. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या, जागतिकीकरणाच्या युगात आदिवासींची सांस्कृतिकता लोप पावेल की काय असा प्रश्न सहाजिकच उद्भवतो. जागतिकीकरणामुळे आदिवासी जीवनशैलीमध्ये आधुनिकता, अविश्वास, भोगवादी आचरण, अशा वेगवेगळ्या गोष्टी भोवतालच्या सामाजिक वातावरणातून साहजिकच स्वतःच्या विकासासाठी काही नकारात्मक गोष्टी स्वीकारल्यामुळे त्यांच्या मूळ संस्कृतीला नष्ट होण्याचा धोका वाढलेला दिसतो. आदिवासी समाजाच्या रूढी परंपरा, प्रथा, लोककला अगदी बोलीभाषा देखील संकटात सापडलेल्या आहे की काय असा प्रश्न उद्भवतो. देशाच्या विकासाच्या नावाखाली आदिवासी समाजाचे होणारे शोषण मात्र चिंताजनक आहे. डॉ.वैजनाथ अनमुलवाड यांनी 'आदिवासी: जीवन आणि जागतिकीकरण' या लेखात मांडले आहे की 'आर्थिक विकासाच्या नावाखाली विविध स्वरूपांचे प्रकल्प उभे करण्यासाठी सरकारकडून बऱ्याच वेळा आदिवासी बहुल क्षेत्राचीच अधिक प्रमाणात निवड करून बहुतांश प्रकल्प आदिवासी इलाख्यात राबविले जात आहेत. त्यांचा लाभ मात्र आदिवासींना तसुभरही मिळत नाही. उलट आदिवासींचे अस्तित्व आणि जमीन जंगलातील हक्क जाणीवपूर्वक हिरावून घेण्यात येत आहेत.'३ आदिवासी समाजातील समस्या कोणत्याही असो परंतु त्यांचा जीवनातील सामाजिक, आर्थिक, भौतिक आणि नैतिक सुधारणांसाठी वैज्ञानिक प्रगती सोबतच साहित्य देखील पूर्ण योगदान देऊ शकते. भारतीय



Smt. V. U. Patil Arts and Late Dr. B. S. Desale Science College Sakri (Dhule)
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri

साहित्याची स्वतःची अशी एक बैठक आहे त्या साहित्याला सर्वग्राहिता संस्कृतीचा आविष्कार आहे. स्थानिक प्रभाव परंपरा जपून नवीन गोष्टींचा स्वीकार करत निर्माण होणारे साहित्य हे मिश्र प्रभावाने विकसित होत आलेले आहे आदिवासी साहित्याची समाजाची जडणघडण करण्यासाठी फार मोलाची भूमिका आहे हे नाकारता येणार नाही.

आदिवासी साहित्यमुळे आदिवासी समाजामध्ये आत्मभान, आत्मजाणीव आणि आत्मबळ निर्माण होत आहे व आदिवासी साहित्य आणि समाज यांच्यामध्ये जैविक संबंध जणू दिसून येतो. आदिवासी साहित्य प्रवाहामुळे मराठी साहित्याच्या कक्षा व्यापक झालेल्या आढळतात.

**संदर्भ सूची**


१) स.मा. गर्गे (संपा.) भारतीय समाज विज्ञान कोश खंड-१ संचालक, समाज विज्ञान मंडळ पुणे, १९८६ पृ.क्र.२२०

२) संपा.डॉ. गोविंद गारे 'आदिवासी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणे' सुगावा प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती, २००५.पृ.१६.

३) संपा. डॉ. वैजनाथ अनमुलवाड, आदिवासी समाज संस्कृती आणि साहित्य इसाक प्रकाशन नांदेड प्रथम आवृत्ती, २०१२पृ.२३९-२४०.

४) डॉ. विनायक तुमराम आदिवासी साहित्य स्वरूप आणि समीक्षा विजय प्रकाशन प्रथम आवृत्ती १९९४

५) डॉ. गोविंद गारे : महाराष्ट्रातील आदिवासी मराठी साहित्य एक शोध.

६) कवी बाहेरून सोनवणे गोधळ कविता संग्रह (१९८७)

७) डॉ. गोविंद गारे : आदिवासी साहित्य विचार.


***


- प्रा.डॉ. वसुमती पुंडलिकराव पाटील

श्रीमती.विमलबाई उत्तमराव पाटील कला व

कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान

महाविद्यालय साक्री.

ता. साक्री. जि. धुळे - ४२४३०४

Email : vasumati1967@gmail.com

मो. ९९२१६४१६७०


***


T.S.S's Smt. V.U. Patil Arts and Late Dr. B.S. Desale Science College Sakri (Dhule)

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule